# <u>प्रेसनोट</u>

दि. ०७/०८/२०२४

**पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत मंजूर घरकुलाची रक्कम मिळवून देण्यासाठी पी.एम.आर.डी. मध्ये कंत्राटी कामकाज करणारे कनिष्ठ अभियंता, इंजिनीअर व खाजगी इसम यांचेवर लाच मागणी व स्विकारले प्रकरणी कारवाई.**

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | सासवड पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलमान्वये. |
| तक्रारदार | पुरुष, वय - ४५ वर्षे |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | १) तेजस संपत तावरे, वय ३२ वर्ष, पद – कनिष्ठ अभियंता (कंत्राटी),<br>२) हेमंत लालासाो वांढेकर, वय २९ वर्ष, पद - इंजिनिअर (कंत्राटी)<br>दोघे नेमणुक - पीएमआरडी कार्यालय, आकुर्डी, पिंपरी-चिंचवड, पुणे.<br>३) रामदास ऊर्फ बाबू मारुती कटके, वय ४८ वर्ष, रा. भिवरी, ता. पुरंदर, जि. पुणे. (खाजगी इसम) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ५०,०००/- (पन्नास हजार रुपये) |
| पडताळणीअंती लाच मागणी रक्कम | ५०,०००/- (पन्नास हजार रुपये) |
| स्वीकारलेली लाच रक्कम | ५०,०००/- (पन्नास हजार रुपये) |
| पडताळणी दिनांक | दि. ०७/०८/२०२४ रोजी. |
| सापळा दिनांक | दि. ०७/०८/२०२४ |

ठिकाण :- दिनांक ०७/०८/२०२४ रोजी हॉटेल सिद्धेश्वर अमृततुल्य, सासवड बस स्टँड समोर, सासवड,ता.पुरंदर,जि. पुणे.

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांनी त्यांचे वडीलांच्या नावाने पंतप्रधान आवास योजने अंतर्गत घरकुलासाठी अर्ज केला होता. सदर योजनेतून तक्रारदार यांना घरकुलाचे २,५०,०००/- रुपये अनुदान मंजूर झाले असून, त्यापैकी पहिला हप्ता रुपये एक लाख तक्रारदार यांचे बँक खात्यावर जमा झाला होता व उर्वरित दीड लाख रुपये जमा करण्याचे आमच्या हातात असून, सदर रक्कम तक्रारदार यांचे खात्यावर जमा करण्यासाठी लोकसेवक क्र. २ हेमंत वांढेकर व खाजगी इसम रामदास कटके यांनी तक्रारदार यांचेकडे ५०,०००/- रुपयाची लाचेची मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

सदर तक्रारदार यांच्या तक्रारीची पडताळणी पंचासमक्ष केली असता, लोकसेवक क्र. १ तेजस तावरे, लोकसेवक क्र. २ हेमंत वांढेकर व खाजगी इसम रामदास कटके यानी पीएमआरडी कार्यालयात ओळख असल्याचे सांगून तक्रारदार यांचे वरील काम करुन देण्यासाठी पंचासमक्ष तडजोडीअंती ५०,०००/- रुपयांची लाच मागणी करुन, लोकसेवक क्र. १ तेजस तावरे यांनी तक्रारदार यांचेकडून रुपये ५०,०००/- लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारले असता, त्या तिघांना ताब्यात घेण्यात आले असून, त्यांचेविरुद्ध सासवड पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलमान्वये गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

ला.प्र.वि. पुणे येथील पोलीस निरीक्षक प्रसाद लोणारे तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
२) व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
३) ई-मेलआयडी - पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
४) वेबसाईट - **www.acbmaharashtra.gov.in**
५) ऑनलाईन ॲप तक्रार - **www.acbmaharashtra.net.in**

(माधुरी भोसले)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उपअधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे